# पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर.

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर,औरंगाबाद शहर-431001(महाराष्ट्र राज्य)


दि.27/03/2018.

## प्रेस नोट

## पोलीस आयुक्तालय हद्दीत कोंबिग ऑपरेशन.

दि.26/03/2018 रोजी औरंगाबाद शहरात पोलीस आयुक्तालयामध्ये कोंबिग ऑपरेश राबविण्यात आले. या ऑपरेशन मध्ये गुन्हेगारांचा शोध घेणे तसेच वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कारवाई करणे या प्रमुख उद्येशाने या ऑपरेशमध्ये कोंबींग व नाकाबंदी करण्यात आली. अशा प्रकारे पोलीस आयुक्तलयामध्ये एकाच वेळी शहरातील 17 पोलीस ठाण्यांतील हद्यीत प्रमुख चौकांत नाकाबंदी करीत दुचाकी, चारचाकी, मालवाहतुक वाहने, जड वाहनांची तपासणी, कागदपत्रांची तपासणी केली. तसेच प्रत्येक दुचाकी, चारचाकी वाहन थांबवुन वाहन परवाना, सिटबेल्ट, दुचाकीस्वाराचे हेल्मेट, वाहनपरवाना तपासण्यात आला. सिटबेल्ट न लावणे, हेल्मेट न घालणे, वाहन परवाना नसणे विनाक्रमांक वाहने, चित्रविचित्र नंबरप्लेट, ओव्हरसीट वाहने यांच्यावर तातडीने दंडात्मक कारवाई करण्यात आली.

कोंबिग ऑपरेशन दरम्यान पोलीस आयुक्तालय अंतर्गत असलेल्या पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी व शाखा प्रभारी अधिकारी यांच्या पथकाने 1) मोटार वाहन कायद्या अंतर्गत 33 केसेस केल्या. 2) महाराष्ट्र दारुबंदी अधियिम अंतर्गत 6 दारु बंदीच्या केसेस करण्यात आल्या आहेत. 3) पोलीस ठाणे मुकुंदवाडी हद्दीतील 01 फरार आरोपीस अटक करण्यात आली तसेच पोलीस ठाणे वाळुज व पोलीस ठाणे एम.वाळुज अभिलेखावरील 02 पोहीजे असलेले आरोपी यांना अटक करण्यात आली. 4) शस्त्रबंदी कायद्यानुसार 01 केस करण्यात आली. अजामीनपात्र वारंट- 30 व जामीनपात्र वारंटची- 09 तामील करण्यात आली. 5) मोटार परीवहन कायदा कलम 185 नुसार 01 केस करण्यात आली. 6) महाराष्ट्र पोलीस कायदा नुसार 39 केसेस, कलम 122 नुसार 03 संशयित इसम यांचेवर कारवाई करण्यात आली तसेच तडीपार आदेशाचे उल्लघंन करणा-या 04 इसम कलम 109 नुसार 02 इसम, व 110 नुसार 02 इसम यांचेवर कारवाई करण्यात आली.

अशा प्रकारे कोंबिग ऑपरेशन दरम्यान 01 पोलीस उप आयुक्त, तसेच 02 सहा.पोलीस आयुक्त, सर्व पो.स्टे व शाखा प्रभारी अधिकारीसह 14 पोलीस अधिकारी व 444 पोलीस कर्मचारी सहभागी होवुन हे ऑपरेशन पार पाडले.

**स्वाक्षरीत/-**

**( डॉ.नागनाथ कोडे )**

सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे)

औरंगाबाद शहर.